# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०१७

## जाहिरात क्र.६६/२०१७

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या **पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०१७** च्या लेखी परीक्षेचा निकाल शासनाच्या दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतुदीस अनुसरुन दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे. शासनाच्या त्यानंतरच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन शुध्दिपत्रकातील तरतूदीस अनुसरुन ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी खुला समांतर आरक्षित पदासाठी निश्चित केलेल्या अर्हतामानाएवढे किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत, परंतु त्यांच्या सामाजिक वर्गवारीतील समांतर आरक्षित पदांसाठी निश्चित केलेल्या अर्हतामानापेक्षा कमी गुण प्राप्त केले आहेत अशा मुख्य परीक्षेत शारीरिक चाचणी व मुलाखतीकरिता अपात्र ठरलेल्या उमेदवारांचा खुला समांतर आरक्षित पदांवर गुणवत्तेनुसार विचार करून त्यांना शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी बोलविण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यानुसार खुला समांतर आरक्षणाच्या सीमांकन रेषेनुसार शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम **दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९** रोजी **पोलीस प्रशिक्षण केंद्र, पोलीस कॅम्प, मरोळ, मरोळ-मरोशी रोड, अंधेरी (पुर्व), मुंबई** येथे घेण्यात येणार आहेत. **शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहे.**

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, लेखी परीक्षेच्या निकालाआधारे शारीरिक चाचणी व मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात येत आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

३. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-ब पदांसाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा म्हणजेच दिनांक १६ मे, २०१७ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल व संबंधित क्रीडा प्रमाणपत्र उमेदवारांनी शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील. सदर अहवाल व क्रीडा प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास खेळाडू आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

४. पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१७ चा निकाल मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल झालेल्या मूळ अर्ज क्र.८०/२०१८ वरील न्यायनिर्णयाच्या अधिन राहून जाहीर करण्यात आला आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ८ फेब्रुवारी, २०१९

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई